स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

५३९,राजेंद्रनगर,कोल्हापूर-४१६ ००४.

Office Phone Chairman- (0231) 2690829(O) 2690679 (R) Secretary -2691405 (O) 2656044 (R)
EPBX 2696101,102,103, Fax -2690758 E-mail divsec.kop@gmail.com

**परिपत्रक क्र.कोविमं/माध्य.परीक्षा/2550 / दिनांक १४/१२/२०२४**

**विषय : मार्च २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खेळाडू विद्यार्थी व दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मंडळ कार्यालयास सादर करण्याबाबत.. ..**

**(१) विशेष गरजा असलेले दिव्यांग विद्यार्थी (दृष्टिबाधित, अध्ययन अक्षम, कर्णबधिर, अस्थि विकलांग, बहुविकलांग, स्वमग्न) यांना मिळणाऱ्या सवलतीबाबत:-**

या संदर्भात या कार्यालयाचे पत्र क्र.कोविमं/10-12 वी परीक्षा / 2501/ दिनांक 11-12-2023 चे पत्र पहावे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**(२) एन.सी.सी व स्काऊट गाईड विद्यार्थी गुण सवलतीबाबत:-**

शैक्षणिक वर्ष सन १८-१९ पासून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या एन.सी.सी. व स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबत सुधारीत कार्यपध्दती शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२ दि.२०/१२/२०१८ व शासन शुध्दिपत्र क्र. उमाशि-२०१५/प्र.क्र.२६२ एस.डी.२ दिनांक २५ जानेवारी २०१९ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे विहीत नमुन्यात प्रस्ताव सादर करावयाचे आहेत.

इ.१० वी चे एन.सी.सी चे छात्र व तसेच स्काऊट व गाईड विद्यार्थ्यांसाठी विविध स्तरावरील शिबीरे व संचालनाचा कालावधी हा त्या त्या शैक्षणिक वर्षातील इ.१० वी च्या परीक्षेपूर्वीचा कालावधी ग्राह्य धरण्यात येईल.

माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांनी मार्च-एप्रिल २०२४ परीक्षेसाठी प्रविष्ठ होण्या-या एन.सी.सी. व स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना सवलतीचे वाढीव गुण देण्याबाबतचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे विहित नमुन्यात प्रमाणपत्रासह सादर करावेत.

**(३) खेळाडू विद्यार्थी गुण सवलतीबाबत:-**

१४ ते १६ वर्षाखालील गटात म्हणजेच इ.६ वी पासून ते इ.१० वी पर्यंत केंव्हाही जिल्हा/विभाग/ राज्य/ राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळलेल्या खेळाडू विद्यार्थ्यास इ.१० वी परीक्षेमध्ये वरील शासन शुध्दिपत्रातील सुधारीत परिशिष्ट ६ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सवलतीचे गुण देण्यात येतील. क्रिडा प्रमाणपत्रावर विद्यार्थी कितव्या इयत्तेत असताना खेळला त्या इयत्तेचा उल्लेख असावा. तथापि इ.१० वी पूर्वी जरी विद्यार्थ्याने प्राविण्य मिळवले असले तरी सवलतीचे गुण मिळविण्याकरीता त्या विद्यार्थ्याने इ.१० वी मध्ये जिल्हास्तरावर क्रिडा प्रकारामध्ये सहभागी होणे आवश्यक आहे.

खेळाडू विद्यार्थी हा कोणत्याही जिल्ह्यातून खेळला तरी खेळाडू विद्यार्थी ज्या ठिकाणी शिकत असेल त्या जिल्ह्याच्या क्रिडा अधिकारी यांनी त्यास प्रमाणित करावे.

इ.१० वी मध्ये शिकत असलेला खेळाडू विद्यार्थी हा एका पेक्षा अधिक खेळात/क्रिडा स्पर्धेत, एन.सी.सी. तसेच स्काऊट गाईड ची शिबीरे यात सहभागी झालेला असेल तर त्याला उच्चतम असणाऱ्या एकाच सहभाग/प्राविण्यचे सवलतीचे गुण अनुज्ञेय राहतील. खेळाडू विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण ग्राह्य धरण्यासाठी विभागीय मंडळाकडे सादर केलेल्या प्रमाणपत्रावर जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्याने ज्या खेळात सहभाग घेतला असेल त्या खेळाचे आयोजन करणाऱ्या संघटनेचे नाव क्रीडा संचालक, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यताप्राप्त यादीत असणे आवश्यक आहे.**विशेष गुण सवलतीचा लाभ फक्त नियमित विद्यार्थ्यांना लागू राहील.खाजगी/बहिस्थ विद्यार्थ्यांना सदरची सवलत अनुज्ञेय नाही, याची नोंद घ्यावी.** कोणताही पात्र नियमित विद्यार्थी या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

जिल्हास्तरावरील,विभागस्तरावरील, राज्यस्तरावरील स्पर्धांमध्ये केवळ प्राविण्य मिळविणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांनाच गुणांची सवलत उपलब्ध राहील. मात्र राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्राविण्य प्राप्त करणाऱ्या तसेच सहभागी होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना क्रिडा गुणाच्या सवलती देय राहतील.

माध्यमिक शाळाप्रमुखांनी यासंदर्भात प्रस्ताव सादर न केल्यामुळे, परिपूर्ण माहिती न कळविल्यामुळे आवश्यक त्या कागदपत्रांची / प्रमाणपत्रांची पूर्तता न केल्यामुळे जर एखादा पात्र विद्यार्थी या सवलतीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी शाळा प्रमुखांवर राहील याची नोंद घ्यावी.

खेळाडू विद्यार्थ्यांनी स्पर्धा संपन्न झाल्यानंतर आपले अर्ज प्रमाणपत्रासह त्वरीत मुख्याध्यापक यांच्याकडे सादर करावेत, व मुख्याध्यापकांनी खेळाडू विद्यार्थ्यांच्या अर्जाची शहानिशा करून संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडे सादर करावा

सदरच्या सर्व सूचना नोटीस बोर्डवर लावून त्या सर्व विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणाव्यात. वरील प्रमाणे कार्यवाही न झाल्यास आणि त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान झाल्यास त्याबाबतची संपूर्ण जबाबदारी शाळा प्रमुखांची राहिल याची गंभीरपणे नोंद घ्यावी. आहेत. ते पाहून त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

(डी.एस.पोवार)
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१.सर्व मान्यता प्राप्त माध्यमिक शाळाप्रमुख, सातारा /सांगली / कोल्हापूर जिल्हा.

२.शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद, सातारा / सांगली / कोल्हापूर
यांनी वरीलप्रमाणे प्राप्त होणारे विहित नमुन्यातील एन.सी.सी.व स्काऊट गाईड गुणांसाठीचे प्रस्ताव समादेशक अधिकारी/गटप्रमुख, राष्ट्रीय छात्रसेना व जिल्हा संघटन आयुक्त स्काऊट गाईड यांचेकडून प्राप्त झालेल्या अभिलेख्यानुसार छाननी करुन दिनांक ३० एप्रिल २०२४ पर्यंत शिफारशी तथा प्रतिस्वाक्षरीसह प्रस्ताव या विभागीय मंडळ कार्यालयास सादर करावेत.

३. जिल्हा संघटक, स्काऊट गाईड जिल्हा कार्यालय कोल्हापूर,सातारा,सांगली

४. जिल्हा क्रीडा अधिकारी, सातारा / सांगली / कोल्हापूर.
वरीलप्रमाणे प्राप्त प्रस्ताव आपली प्रमाणपत्रावरील प्रतीस्वाक्षरी व शिफारशीसह मंडळाने निर्धारीत केलेल्या विहित नमूनयात ३० एप्रिल २०२४ पर्यत परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयाकडे पोहोचतील या बेताने हस्तपोच पाठवावेत. तद्नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**प्रत माहितीस्तव -**

२. शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर.